ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल – gkmsparbhani@gmail.com

**कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - ०३/२०१९-२०** **मंगळवार, दिनांक - ०९.०४.२०१९**

## मराठवाडयाकरीता चालु आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक १० ते १४ एप्रिल, २०१९)

| हवामान घटक | जिल्हयाचे नांव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | औरंगाबाद | बीड | हिंगोली | जालना | लातुर | नांदेड | उस्मानाबाद | परभणी |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ४१.० | ४२.० | ४२.० | ४१.०-४२.० | ४१.०-४३.० | ४०.०-४१.० | ४१.०-४२.० | ४२.०-४३.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.०-२५.० | २५.०-२६.० | २२.०-२५.० | २५.०-२६.० | २५.०-२६.० | २३.०-२५.० | २२.०-२४.० | २२.०-२५.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | १९ - २५ | १७ - १८ | १३ - २२ | १७ - २१ | १६ - २८ | १७ - २८ | १७ - २९ | १५ - १९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ०९ - १० | ०७ - ०९ | ०७ - ०९ | ०९ - ११ | ०७ - ०९ | ०८ | ०७ - ०९ | ०७ - ०९ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | १३ - १९ | ०८ - १४ | ०९ - १५ | १० - २६ | ०७ - ११ | ०७ - ११ | ०६ - १४ | ०९ - १७ |
| वा-याची दिशा | आग्नेय ते वायव्य | नैऋत्य ते पश्चिम | पश्चिम ते वायव्य | वायव्य | दक्षिण ते पश्चिम | आग्नेय ते पश्चिम | आग्नेय ते वायव्य | पश्चिम ते वायव्य |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| केळी | वाढीची अवस्था | केळी बागेस पाणी व्यवस्थापन करावे तसेच बागेत आच्छादन करावे. |
| आंबा | फळ वाढीची अवस्था | आंबा बागेत पाणीव्यवस्थापन करावे. पाण्याचा ताण बसत असल्यास १३:००:४५ २० ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| द्राक्ष | छाटणीपूर्व अवस्था | द्राक्ष बागेत एप्रिल छाटणीसाठी पूर्व तयारी करावी. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | भाजीपाला पिकात पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी. वेलवर्गीय भाजीपाला पिके सध्या फळधारणा ते फळ वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकास पाण्याचा ताण बसल्यास फुलगळ होते फुलगळ होऊ नये म्हणून पिकास नियमीत पाणी दयावे. |
| फुलशेती | वाढीची अवस्था | हंगामी फुलझाडांची लागवड केली असल्यास तीव्र उन्हापासून रोपांचे संरक्षण करावे. तसेच रोपांना नियमित व वेळेवर पाणी दयावे. रोपांना ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. |
| तुती रेशीम उदयोग | -- | दुस-या वर्षापासून पुढे व्ही-1 तुतीच्या जातीचे २५ टन एकरी पानांचे उत्पादन मिळते. तुतीलागवड एक एकर असेल तर एक वेळा २५० ते ३०० अंडीपुंज्याचे किटक संगोपन करता येते. त्यासाठी ८०० ते १००० चौ.फुट चटई क्षेत्र १०० अंडीपुंज याप्रमाणे बाल्य व प्रौढ किटक संगोपनासाठी लागते आणि यापासून कोषाचे २.५ क्विंटल पर्यंत उत्पादन मिळते. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | वाढत्या तापमानापासून कोंबडयाचे संरक्षण करण्यासाठी तसेच शेडमध्ये थंडावा राखण्यासाठी शेडच्या बाजूने पोते (बारदाना) बांधून त्यावर पाणी शिंपडावे. पक्ष्यांना सातत्याने स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी जेणेकरून पक्ष्यांना उष्माघात होणार नाही. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**मुख्य प्रकल्प समन्वयक**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापीठ, परभणी**